# राजर्षि शाहू गव्हर्मेंट सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

नोंदणी कार्यालय : 'राजर्षि शाहू भवन ',746,ई वॉर्ड, भास्करराव जाधव रोड, शाहूपुरी 3 री गल्ली ,
कोल्हापूर - 416 001. दूरध्वनी : (0231)2661803 , 2655813

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

( फक्त सभासदांकरीता )

या बँकेची 108 वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार** दिनांक 21-09-2025 रोजी **सकाळी 11.00 वाजता प्रतिभानगर हौसिंग सोसायटी हॉल, प्लॉट नं.14, सागरमाळ , कोल्हापूर** येथे खालील कामकाजांचा विचार करणेकरीता बोलाविणेत आलेली असून सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

1) दिनांक 22-09-2024 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
2) सन 2024-2025 सालचा वार्षिक अहवाल , ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
3) सन 2024-2025 साली बँकेस झालेल्या निव्वळ नफ्याची विभागणी करणे.
4) सन 2024 - 2025 सालचे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन 2025 - 2026 सालचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
5) वैधानिक लेखापरिक्षक विश्राम कुलकर्णी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट,कोल्हापूर यांनी दिलेला सन 2024-2025 लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करणे व सन 2023-2024 च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
6) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निकषास अधिन राहून मा.संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार सन 2025-2026 सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षक नेमणूकीबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व त्या अनुषांगिक कार्यवाही करणे.
7) सन 2026-2027 वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षकांच्या नेमणूकीबाबत निर्णय घेणे व मानधन ठरविणे.
8) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 75/2 प्रमाणे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे कुटुंबियांना दिलेल्या कर्जाची माहिती / तक्ता सभेपुढे ठेवणे.
9) वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
10) एकरकमी व सामोपचार कर्ज परतफेड योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या कर्ज खात्यांची माहिती अवलोकन करुन त्यास मंजुरी देणे.
11) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे. ( पोटनियम दुरुस्तीचा मसुदा अहवालामध्ये अलाहिदा छापला असून बँकेच्या प्रधान कार्यालय व शाखा कार्यालयामध्ये नोटीस बोर्डवर लावणेत आला आहे.)
12) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन

कोल्हापूर. दिनांक 16 / 08 / 2025

| | |
|---|---|
| **सुरेश सुलोचनादेवी रामराव शिंदे** | **रोहित रोहिणी प्रकाश बांदिवडेकर** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

---

<u>**टीप**</u> : **1) सभासदांना बँकेच्या ओळखपत्राशिवाय सभेमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.** 2) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी 11.30 वाजता घेणेत येईल. 3 ) सभासदांनी त्यांना पाहिजे असलेली माहिती व सूचना बँकेच्या प्रधान कार्यालयात दिनांक 17/09/2025 पूर्वी लेखी सादर करावी. 4) लाभांश तीन वर्षापर्यंत न घेता राहिल्यास पोटनियमास अधिन राहून राखीव निधीकडे वर्ग केला जाईल. 5) सभासदांनी आपल्या पत्त्यात बदल झाला असलेस तसेच संपर्क दुरध्वनी अथवा मोबाईल क्रमांक तसेच केवायसी कागदपत्रे याची माहिती बँकेस द्यावी.